# ॥संक्षिप्त श्री गुरुचरित्र ॥



॥श्री गणेशाय नमः॥

॥श्री गुरुदेव दत्त॥

॥श्री स्वामी समर्थ॥

॥श्रीपाद राजम् शरणं प्रपद्ये॥

॥दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा॥

# अध्याय पहिला

श्री गणेशाय नमः। श्री सरस्वत्यै नमः। श्री गुरुभ्यो नमः।।

श्रीपाद श्रीवल्लभ श्री नृसिंह सरस्वती दत्तात्रेयाय नमः ।।

ॐ द्राम् दत्तात्रेयाय नमः। ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय।

अवधूत निरंजन दत्त। दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा।।

।। ध्यानम् ।।

बालार्कप्रभमिन्द्रनीलजटिलं भस्माङ्गरागोज्ज्वलं।

शांतम् नाद विलीनचित्तपवनम् शार्दूलचर्माम्बरम्।।

ब्रह्मज्ञै सनकादिभिः परिवृतं सिद्धैः समाराधितम्।

दत्तात्रेय मुपास्महे हृदि मुदा ध्येयं सदा योगिभिः।।

श्री गुरुचरित्र पवित्र ग्रंथ। सिद्ध नामधारकाते सांगत। अनेक उद्धरिले भक्त। दिव्य ग्रंथाच्या पठणाने ॥१॥ परी सांप्रत कली दारुण। जना न जमे पवित्राचरण। म्हणोनी गुरुदयाळ पूर्ण। मजला स्वप्नी सांगतसे ॥२॥ श्री गुरुचरित्र संक्षिप्त। लिही म्हणती मजप्रत। श्रवण पठणे निश्चित । कल्याण होईल सकलांचे ॥३॥ ऐसे सांगोनी गुप्त। होती पाहा स्वामी समर्थ। त्यांचे चरित्र अद्‌भुत। यथामति वर्णितो ॥४॥ अत्री अनुसूया कारण। दत्तात्रेयाचे अवतरण। माहूरगडी राहून। अनंत लीला करीतसे ॥५॥ यदू, अलर्क, परशुराम। कार्तवीर्य,राजनन्दन। ऐसे शिष्य निर्माण। केले पाहा श्री गुरुने ॥६॥ ॐ द्राम् ॐ बीजमंत्र। पठणे प्रकटे श्री दत्त। ऐसे माहात्म्य अद्‌भुत। श्री दत्ताचे आहे हो ॥७॥ अवतार येती आणि जाती। तैसी नोहे दत्तमूर्ती। सदा राहे पृथ्वीवरती। लोकोद्धार करावया ॥८॥ करावया जगदुद्धार। स्वये कष्टे विश्वंभर।श्री दत्तात्रेय अवतार। विविध रूपे राहतसे ॥९॥ अनेक रूपे घेवोनी। श्री दत्त संचरती जनी। जना सन्मार्ग दावोनी। मोक्षमार्गा लावीतसे ॥१०॥ त्याची रूपे अनंत। झाली असती पुढे होत। सर्व धर्मांत श्री दत्त । विविध रूपे राहतसे ॥११॥

काशीमध्ये स्नान करी। भिक्षा मागे कोल्हापुरी। माहूरगडी शयन करी। ऐसा महिमा जयाचा ।।१२।। कधी मलंग वेषात। कधी साधू रूपात। कधी गौर वर्णात। फिरे दत्त महास्वामी।।१३।। कधी वृद्ध कधी कुमार। यती कधी दिगंबर। श्री दत्तरूप अगोचर। विविध रूपे फिरतसे।।१४।। पीठापूर ग्रामात । आपळराज-सुमती राहत। श्री दत्तात्रेयाते आराधित। मनोभावे करोनिया।।१५।। तव एके दिनी अकस्मात। साधू रूपे येती दत्त। भिक्षांदेही म्हणत। दारी उभे राहोनिया।।१६।। सुमती भिक्षा वाढत। पोटभरी जेवा म्हणत। प्रसन्न होवोनी श्री दत्त। म्हणती काय हवे तूते।।१७।। सुमती म्हणे इच्छा एक। आहे सदैव मनात। विश्वोद्धारक श्री दत्त। पुत्र व्हावा मज तैसा।।१८।। तथास्तु म्हणे श्री दत्त । आणि तेथेचि होती गुप्त। दिव्य तेज फाकत । विस्मये ती पाहतसे।।१९।। पीठापूर आंध्र प्रदेशात। अवतार घेती श्री दत्त। श्रीपाद श्रीवल्लभ नाम होत । प्रसिद्ध जाणा दत्ताचे।।२०।। सोळा वर्षापर्यंत। माता पित्याते सुख देत। मग जाती हिमालयात। दर्शन द्याया भक्तांते।।२१।। तेथूनी येती वाराणसीत। काही काळ राहती गुप्त। येवोनी गोकर्ण क्षेत्रात। लोकोद्धार करिती

ते ।।२२।। तेथूनी कुरवपुरात । अंति स्थायिक होत। दूरदुरोनी लोक येत। स्वामी दर्शना कारणे ।।२३।। महिमा होई अमित। अन्नदान होई नित्य। कुरवपूर महासिद्ध। पीठ जाणा होतसे।।२४।। कुरवपुरी एक रजक । स्वामीते नित्य नमस्कारीत। एके दिनी त्यासी पुसत। काय हवे हो तुजलागी।।२५।। रजक म्हणे स्वामीप्रत । राजा व्हावे ऐसे वाटत। सुखी प्राणी या जगात। एकची असे राजा तो।।२६।। श्रीपाद श्रीवल्लभ म्हणत। राजा हो पुढील जन्मात। तो म्हणे दर्शन मजप्रत। पुढील जन्मात होईल का ।।२७।। स्वामी म्हणती तयाप्रत। मीही पुन्हा अवतरत। देईन दर्शन तुजप्रत। विश्वास ठेवी बोलाचा।।२८।। श्रीपाद श्रीवल्लभ समर्थ। कुरवपुरी राहत। लोकोद्धार करीत। अमित महिमा होतसे।।२९।। ऐसे परी कार्य करीत। भक्त इच्छा पुरवीत । जो जे मागे त्या ते देत। महास्वामी अवधारा।।३०।। श्री गुरुचरित्र संक्षिप्त। सारभुत येथे पाहत । श्रीपाद श्रीवल्लभ समर्थ। कुरवपुरी प्रकटले ।।३१।।

।। अध्याय पहिला।। ।। ओवी संख्या ३१।।

# अध्याय दुसरा

## श्री गणेशाय नमः। ॐ द्राम दत्तात्रेयाय नमः॥

कुरवपुरी राहती श्री दत्त । श्रीपाद श्रीवल्लभ समर्थ। अनेक लीला दावीत। लोकोद्धाराकारणे ॥१॥ ऐसी काही वर्षे जात। मग म्हणती भक्तांप्रत। आम्ही आता होऊ गुप्त । येथोनिया अवधारा ॥२॥ होऊ येथूनी गुप्त। जावोनी राहू कर्दळीवनात। काही काळ तप करीत। राहू आम्ही तेथवरी॥३॥ नंतर पुन्हा परत। अवतार घेऊ महाराष्ट्रात। नृसिंह सरस्वती नामे प्रख्यात। होऊ आम्ही अवधारा॥४॥ ऐसे सांगोनी भक्तांप्रत। कृष्णा नदीत होती गुप्त। श्रीशैल पर्वती प्रकटत। महास्वामी अवधारा ॥५॥ काही काळ राहोनी तेथ। कर्दळीवनी प्रवेशत। समाधी लावोनी बैसत। काही वर्षे तेथवरी॥६॥ समाधिते विसर्जोनी । अवतार घेती श्रीपादमुनी। कारंजा ग्राम म्हणोनी। महाराष्ट्रात अवधारा॥७॥ तेथे अवतार घेत। उपजता ॐ म्हणो लागत। लोक आश्चर्यचकित। म्हणती दिव्य बालक हे॥८॥ न रडे न मागे काही। बालक ॐ म्हणत राही। सदा हास्य करीत राही। ॐ ऐसे म्हणोनिया ॥९॥ दिवस रात्र ॐ म्हणत। ॐ ध्वनी

गृही गुंजत। ॐ प्रकटला म्हणत। लोक विस्मये तेधवा ।।१०।। ऐसी जाती वर्षे सात। बालक ॐ राहे म्हणत। परी न काही बोलत। चिंतित होती सर्वही ।।११।। इतरे जन जे बोलत। ते सर्व कळे बालकाप्रत। परी प्रत्युत्तरी ॐ म्हणत। आणिक काही बोलेना ।।१२।। अंति पुसती तयासी। सांग तू केव्हा बोलसी। बालक खूण करोनी त्यासी। सांगतसे ते अवधारा ।। १३।। खूण करोनी दावीत । मौजीबंधन करा म्हणत। उपनयन होता त्वरित। बोलेन आपण म्हणतसे।।१४।। ऐसे ऐकोनी मातापिता। मौजीबंधन तत्त्वता । करो म्हणती निश्चिता। तयारी करो लागले ।।१५।। सुमुहूर्त पाहोनी उपनयन। केले पाहा मौजीबंधन। बालक वेदमंत्र म्हणोन। निज मौनाते सोडीतसे।।१६।। सर्वां आश्चर्य वाटत। बालक पाहा वर्षे सात। वेदमंत्र म्हणो लागत। अवतार म्हणती दत्ताचा।।१७।। तव नृसिंह सरस्वती। म्हणती सर्व लोकांप्रती। आम्ही संन्यासी असो यती। गृही न राहू निश्चये ।।१८।। ऐसे सांगोनी सर्वांप्रत । निघाले स्वामी हिमालयात। तेथे तप आचरीत। लोकोद्धाराकारणे।।१९।। तेथूनिया पुन्हा परत। तीर्थयात्रा करीत करीत। औदुंबर स्थान जेथ। तेथे येऊनी राहिले ।।२०।। भिलवडी ग्रामा समिपत। औदुंबर स्थान प्रख्यात ।

आज जाहले असत। दत्तस्थान म्हणोनिया॥२१॥ चार मास राहती तेथ। शक्ती ठेविती अमूप। पादुका तेथे स्थापित । जगदोद्धाराकारणे॥२२॥ ते औदुंबर पादुका स्थान। आज प्रख्यात दत्त स्थान। मनोकामना होती पूर्ण। ऐसे तीर्थस्थान ते ॥२३॥ उदर व्यथेने पीडित। ब्राह्मणा करिती व्याधिमुक्त ।मूढा विद्वान करीत। ऐसा महिमा जयाचा॥२४॥ माधव विप्रासी ब्रह्मज्ञान। देती स्वामी कृपा करोन। सायंदेवासी अभयदान। श्री गुरुकृपे मिळतसे ॥२५॥ भक्तांसी उपदेश देती। देह हा अनित्य म्हणती। धर्म करा म्हणूनी सांगती। मोक्षमार्गाते पावाया ॥२६॥ सर्व येथे राहणार। काही न येई बरोबर। सत्कर्म आणि सदाचार। हेचि जीवाचे सांगाती॥२७॥ सायंदेव दत्तभक्त । कडगंची ग्रामी राहत । तयावरी कृपा बहुत । केली पाहा श्रीगुरुने ॥२८॥ श्रीगुरु सायंदेवासी म्हणत । सदैव तुझ्या वंशात । दत्तभक्ती राहे नांदत । प्रिय भक्त आमुचा तू ॥२९॥ सायंदेव महाभक्त । तयासी स्वामी सांगत । आम्ही तुमचे गावा समिपत । भविष्यकाळी वास करू ॥३०॥ सायंदेवाचे वंशात । महाभक्त जन्मा येत । नाम सरस्वती असत । तया महा भक्ताचे ॥३१॥ दत्तकृपा व्हावी प्राप्त । म्हणोनी

जाई अरण्यात । तेथे भेटती महासिद्ध । शिष्य पाहा श्रीगुरुचे ॥३२॥ सरस्वतीसी म्हणती सिद्ध । तू लिही श्रीगुरुचरित्र । श्रीगुरु कथा त्यासी सांगत । महासिद्ध ते अवधारा ॥३३॥ श्रीगुरुंच्या दिव्य कथा । महासिद्धांनी लिहिल्या होत्या । घेऊनी हाती त्या ग्रंथा । चरित्र लिखाणा आरंभिले ॥३४॥ सरस्वती नामे तो भक्त । पिता गंगाधर असत । सरस्वती गंगाधर नामधारक । लिही चरित्र श्रीगुरुचे ॥३५॥ सायंदेवासी आश्वासीत । तव ग्रामा समिपत । गाणगापुरी राहू म्हणत । भविष्यकाळा माझारी ॥३६॥ सायंदेवासी आश्वासून । श्रीगुरु करिती प्रयाण । औदुंबर स्थानी येऊन । कृष्णा किनारी राहिले ॥३७॥ तया औदुंबर स्थानात। चार मास राहती श्री दत्त। तेथूनी पुढे निघत। लोकोद्धार करावया॥३८॥ तेथूनी पुढे निघती । नृसिंहवाडी स्थानी जाती। द्वादश वर्षे तेथे राहती। तप करिती ते देखा॥३९॥ श्री गुरुचरित्र संक्षिप्त । दत्तलीला येथे पाहत। श्रीनृसिंह सरस्वती स्वामी समर्थ। औदुंबरी राहिले ॥४०॥

॥ अध्याय दुसरा॥ ॥ ओवी संख्या ४० ॥

# अध्याय तिसरा

श्री गणेशाय नमः। ॐ नमो भगवते दत्तात्रेयाय ॥

दत्तात्रेयो हरि कृष्णो। मुकुंदो आनंददायकः। मुनी दिगंबरो बालो। सर्वज्ञो ज्ञानसागरः ॥१॥
श्रीनरसिंह सरस्वती। अमरापूर ग्रामा येती। कृष्णा नदीकिनारी राहती। औदुंबर तळी देखा ॥२॥
द्वादश वर्षे तेथे राहत। लोकोद्धारा तप करीत। अनेक लीला दावीत। भक्तरक्षणा कारणे ॥३॥
नृसिंहवाडी म्हणोन। आज प्रसिद्ध ते स्थान। सहस्रावधी भक्तजन। नित्य जाती दर्शना ॥४॥
मनोहर पादुका असत। जलयोगिनी सेवा करीत। देवदेवता पूजीत। ऐसे महास्थान ते ॥५॥
जगदोद्धाराकारण। नृसिंह सरस्वती दत्त आपण। विविध लीला दाखवोन। मनोरथ पुरविती भक्तांचे ॥६॥ अनेक लीला तेथे केल्या। आहेत गुरुचरित्री वर्णिल्या। महासिद्ध स्थान ये वेळा । नृसिंहवाडी आहे हो ॥७॥ संक्षिप्त असे हा ग्रंथ। परी काही लीला सांगत। श्री गुरुचरित्र अद्भुत। कोणी वर्णो शकेना ॥८॥ अमरापूर ग्रामात। श्री गुरु जाती भिक्षेप्रत।

एक ब्राह्मण होता तेथ। दारिद्र्याने गांजलेला ॥९॥ घेवड्याचा वेल असत। शेंगा त्यासी बहु लागत। तेणे उदरनिर्वाह करीत। ऐसे जीवन चालले ॥१०॥ त्याचे घरी भिक्षेसी जात। तो प्रेमे नेई गृहात। घेवड्याची भाजी वाढीत। तृप्त केले गुरुराया॥११॥ श्री गुरु म्हणती तयाप्रत। तू होशील श्रीमंत। ऐसे म्हणोनी निघत। तेथूनी पुढे जावया॥१२॥ गृहाबाहेर येत। घेवड्याचा वेल तोडीत। आणि निघोनी जात। स्वस्थानासी श्री स्वामी॥१३॥ कुदळ घेवोनी हातात। ब्राह्मण मूळ खोदू लागत। तव गुप्तधन अकस्मात। त्यासी पाहा हो सापडले ॥१४॥ धनाचा हंडा मिळत। ब्राह्मण होई श्रीमंत। पिढ्या सात पुरोनी उरत। इतुके धन मिळे त्याते ॥१५॥ श्री दत्त दयावंत। ऐसी लीला दावीत। दारिद्र्य भक्ताचे हरीत। करुणासागर श्री गुरु ॥१६॥ संतती, संपत्ती, आरोग्य। विद्या, ज्ञान, वैराग्य। आत्मज्ञान आणि योग। सर्वही मिळे भक्तांना ॥१७॥ नृसिंह सरस्वती दत्त। औदुंबर तळी तप करीत। कृष्णा नदीसमीप वाहत। नृसिंहवाडी माझारी॥१८॥ एके दिनी एक भक्त । दुरोनी होता पाहत। कृष्णा नदी दुभंगत। देवता येती बाहेरी॥१९॥ जलदेवता बाहेर येत। स्वामी पूजा करो लागत। भक्त होई

विस्मित। अद्‌भुत प्रकार पाहोनिया ॥२०॥ योगिनी स्वामीते पूजीत। दिव्य प्रकाश तेथे पसरत। श्री गुरु रूप अद्‌भुत। भक्त तेव्हा पाहतसे ॥२१॥ नृसिंहवाडी स्थानात। बारा वर्षे श्री गुरु राहत। सिद्धस्थान अद्‌भुत । निर्माण केले तेथवरी ॥२२॥ मनोहर पादुका स्थापित। त्याची पूजा करा म्हणत। पूर्ण होती मनोरथ। सद्‌भक्तांचे निश्चये ॥२३॥ ऐसे म्हणोनी श्री दत्त। गाणगापुरी जावोनी राहत। नृसिंहवाडी स्थानात। अपार शक्ती ठेविली ॥२४॥ नृसिंहवाडी स्थानात। चमत्कार होती नित्य। लोक भक्ती करीत। तेथे मनोहर पादुकांची ॥२५॥ गेल्या सातशे वर्षांत। उद्धरिले लोक अनंत। अपार महिमा होत। आहे आजही तेथवरी ॥२६॥ शिरोळ ग्रामीचा एक भक्त । पाच पुत्र त्याचे मरत। येवोनी नृसिंहवाडीत। पादुकाते सेवीतसे ॥२७॥ पतिपत्नी पादुकाते सेवीत। पूजाअर्चा करिती नित्य। औदुंबर प्रदक्षिणा करीत। सेवा करीत राहिले ॥२८॥ एक मास ऐसे करीत। श्री गुरु स्वप्नी येत। पुत्र होईल म्हणत। अभय देती तिजलागी ॥२९॥ प्रसन्न वदने गृही जात। पुत्र होई तिजप्रत। अति आनंदे वर्तत। होती पाहा तेथवरी ॥३०॥ पुत्रासी झाली वर्षे सात । घाला आला अकस्मात।

पुत्र झाला मृत। एके दिनी अवधारा॥३१॥ मातापिता दु:खित। माता म्हणे आक्रंदत। श्री गुरुनी दिधला वत्स। अल्पायुषी का झाला॥३२॥ लोक तिसी समजावीत। परी ती काही न ऐकत। अपार दु:ख करीत। पुत्र शवाते बिलगोनी ॥३३॥ तव श्री गुरु समर्थ। साधू रूपे तेथे येत। म्हणती जा पादुकास्थानात। वर लाधला तुला जेथे ॥३४॥ पुत्र शवाते घेवोन। जाई नृसिंहवाडी स्थान। पादुकावरी शिर ठेवोन। अपार दु:ख करीतसे ॥३५॥ ऐसे करिता रात्र झाली। निद्रा तिसी लागली। स्वप्नी गुरुमूर्ती आली। काय दु:ख म्हणती ते ॥३६॥ पुत्र आहे जिवंत। उगाच दु:ख का करत। ऐसे ऐकोनी उठत। माता विस्मित होतसे॥३७॥ पुत्राते पाहे जीवित। पतीसी उठवोनी दावीत। श्री गुरुकृपा अद्‌भुत। म्हणोनी नमन करीतसे॥३८॥ नृसिंहवाडी पादुकास्थान। अपार असे महिमान। अदृश्य रूपे नारायण। तेथे राहे सर्वदा॥३९॥ म्हणोनी सरस्वती गंगाधर। सांगे गुरुचरित्र विस्तार। श्रोतया विनवी वारंवार। भजा भजा हो श्री गुरूसी॥४०॥

॥ अध्याय तिसरा ॥ ॥ ओवी संख्या ४०॥

# अध्याय चौथा

श्री गणेशाय नमः । अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।

श्री गुरुचरित्र अमृत। प्राशिता अमर होती भक्त ।श्री गुरुचरित्र सुधारस। म्हणोनी नित्य सेवावा।।१।। तया नृसिंहवाडीत । द्वादश वर्षे गुरु राहत। दीन जना उद्धरीत। कृपाकटाक्षे करोनिया।।२।। असो नृसिंहवाडी सोडून। गुरु येती गाणगापूर स्थान। भीमा अमरजा संगम पाहोन। तप करिती ते त्या स्थळी।।३।। संगमी अनुष्ठान करीत। भिक्षेसी येती ग्रामात। एक ब्राह्मण होता तेथ। दारिद्र्याने गांजलेला।।४।। कधी कधी श्री गुरुनाथ। त्याचे घरी भिक्षेसी जात। तो प्रेमे नेई गृहात। अति आदर करीतसे।।५।। एकदा त्या गृही जात। ब्राह्मण नसे गृहात। भार्या त्याची या म्हणत। पाट देई बैसावया।।६।। श्री गुरूसी बैसवोनी। म्हणे पाहा ती ब्राह्मणी। आजी घ्यावे फक्त पाणी। गृही काही असेना।।७।। तव म्हणती श्री गुरुनाथ। म्हैस बांधली दारात। दूध देई मजप्रत। ऐसे म्हणती तियेला।।८।। श्री स्वामीसी ती म्हणत।

वांझ म्हैस ती असत। तव म्हणती श्री गुरुनाथ। दोही आम्हा पुढे तू ।।९।। ब्राह्मणी म्हैस दोहत। दोन हंडे दूध मिळत। अति आश्चर्य वाटत। पाहोनी लीला स्वामींची ।।१०।। वांझ महिषी दूध देई। वार्ता सर्वा कळे ही। दर्शनासी गर्दी होई। श्रीनृसिंह सरस्वती स्वामींच्या ।।११।। कुमसी नामे ग्रामात। एक यती होता राहत। त्रिविक्रम भारती असत। नाम त्या यतिरायाचे ।।१२।। स्वामी कीर्ती ऐकोन। निंदा करी आपण। म्हणे संन्याशासी महिमान। ऐसे हवे कशाला ।।१३।। स्वामी नृसिंह सरस्वती। आपुल्या भक्ता सांगती। जावे कुमसी ग्रामाप्रती। भेटू म्हणती यतीला ।।१४।। बैसोनिया पालखीत। त्या यतीच्या ग्रामा जात। यती दुरोनी पाहत। साष्टांग नमन करीतसे।।१५।। रोज त्रिविक्रम भारती। मानसपूजा जी करिती। त्या रूपे नृसिंह सरस्वती। देती दर्शन तेधवा ।।१६।। पाहोनी इष्ट दैवत। मुनी स्वामीते नमस्कारित। म्हणे तू साक्षात दत्त। नररूपे राहतसे ।।१७।। ऐशा लीला अनंत। श्री गुरु भक्तांसी दावीत। भक्तिमार्गाते वाढवीत। गाणगापुरी राहोनिया।।१८।। त्रिविक्रम भारती।

भजे नृसिंह सरस्वती। लोक बहु मान देती। महासाधू म्हणोनिया ।।१९।। दोन विद्वान पंडित। त्रिविक्रम भारतीसी म्हणत। आम्ही महापंडित। चारी वेद जाणतसो ।।२०।। ग्रामोग्रामी फिरोन। अनेक पंडिता हारवोन। जयपत्रे घेवोन। आम्ही येथे आलोसे ।।२१।। तुम्ही महापंडित। ऐसे कळले आम्हाप्रत। वाद करावया वेदांत। म्हणोनी आम्ही आलोसे ।।२२।। आम्हासवे वाद करा। अथवा हार मान्य करा। विजयपत्र सत्वरा। लिहून द्यावे आम्हांसी ।। २३।। त्रिविक्रम भारती म्हणत। आम्ही संन्यासी असत। न जाणो वेदशास्त्रार्थ । काही न कळे आम्हांसी ।।२४।। मग हारीपत्र द्या लिहून। ऐसे म्हणती ब्राह्मण । यती म्हणे त्या लागोन। गाणगापुरी चलावे।।२५।। तेथे असती श्री गुरुवर। नृसिंह सरस्वती अवतार। हारीपत्र तया समोर। लिहून देईन तुम्हांसी ।।२६।। चला म्हणोनी उठत। ब्राह्मण बैसती पालखीत। त्रिविक्रम यती चालत। निघाले गाणग ग्रामासी।।२७।। गाणगापुरासी येत। श्री स्वामीसी नमस्कारीत। त्रिविक्रम भारती म्हणत। श्री स्वामीसी तेधवा।।२८।। वाद करण्या ब्राह्मण।

आले पाहा दुरोन। पत्र मागती लिहून। हरलो ऐसे म्हणोनिया ।।२९।। श्रीनृसिंह सरस्वती। त्या ब्राह्मणाते पाचारिती। आढ्यतेने उभय येती। बैसती समोर स्वामींच्या।।३०।। स्वामी तयासी म्हणत। विद्या विनयेन शोभत। वाद करोनी काय मिळत। लिहूनी कासया हवे तुम्हां।।३१।। आढ्यताखोर ब्राह्मण। नोळखिती श्री गुरु लागोन। म्हणती द्या लिहून। हरलो म्हणोन दोघेही ।।३२।। अथवा जिंका वादात। चारी वेद आम्हा पाठ। आम्हासवे शास्त्रार्थ। करोनी जिंका तुम्ही हो।। ३३।। श्री गुरु त्याते समजावीत। परी ते न ऐकत। वाद करा ऐसे म्हणत। पुन्हा पुन्हा तेथवरी ।।३४।। इतुकिया अवसरी। श्री गुरु देखती नरासी दूरी। एक मातंग अवधारी। जात होता तेधवा ।।३५।। स्वामी त्याते पाचारिती। कोठला कोण विचारिती। तो म्हणे शेतावरती। चाललो काम करावया।।३६।। स्वामी शिष्यासी सांगत। रेषा भूमीवरी काढी सात। शिष्य रेषा काढीत। श्रोते पुढे अवधारा।।३७।। मातंगासी स्वामी म्हणत। एकेक रेष ओलांडीत। पुढे येई म्हणत। मातंग तैसे करीतसे ।।३८।। पहिली रेषा लंघिता। स्तब्धता

आली चित्ता। म्हणे मी भिल्ल पर्वता। बनराखा नाम माझे ।।३९।। दुसरी रेषा लंघिता। बोलू लागे अनेक वार्ता। लोक विस्मित चित्ता। पाहो लागले स्वामीसी।।४०।। तिसरी रेषा लंघिता। म्हणे आपण गंगासुत। का मजसी पाचारीत। ऐसे म्हणोनी पुसतसे ।।४१।। चौथी रेषा लंघिता। म्हणे आपण शूद्र याती। जात होतो आपुले वृत्ती। स्वामी माते पाचारिले।।४२।। पाचवी रेषा लंघिता। म्हणे मी वैश्य आता। व्यापार उदीम तत्त्वता। सोमदत्त नाम माझे।।४३।। सहावी रेषा लंघिता । म्हणे मी क्षत्रिय ख्याता। अनेक पराक्रम कर्ता। गोदावरी नाम माझे ।।४४।। सातवी रेषा लंघिता क्षण। म्हणे मी पूर्ण ब्राह्मण । वेदशास्त्र व्याकरण। सर्व काही जाणतसे ।। ४५।। करा वाद मजसी म्हणत। मी आहे शब्दपंडित। सर्व वेद कंठस्थ। करोनी येथे आलोसे।। ४६।। श्री गुरु म्हणती त्यासी। हे ब्राह्मण आले चर्चेसी। यासवे वेद वादासी। तू करावे म्हणोनिया।। ४७।। पाहोनी हा चमत्कार। पंडित कापती थरथर। करिती साष्टांग नमस्कार। श्री गुरु नृसिंह स्वामीसी।। ४८।। नमस्कार करोनी ब्राह्मण। गेले क्षमा मागोन ।

इकडे शूद्र होवोनी ब्राह्मण । लोकांसी तो म्हणतसे ।।४९।। मी आहे ब्राह्मण। शिवो नका मज लागोन। हे सर्व पाहोन। जना विस्मय वाटतसे ।।५०।। स्वामी शिष्यांसी म्हणती। पाणी ओता शिरावरती । होईल सर्व विस्मृती। पुन्हा मातंग होईल तो।।५१।। ओतता जल डोक्यावर। सर्व पडला त्यासी विसर। करोनी स्वामीसी नमस्कार। शेतावरी तो जातसे।।५२।। श्री गुरुचरित्र अद्भुत। येथे सांगे संक्षिप्त। दत्तावधूत आपुले चित्त। श्री गुरुचरणी वाहतसे।।५३।।

।। अध्याय चौथा ।। ओवी संख्या ५३ ।।

# अध्याय पाचवा

## श्री गणेशाय नमः। ॐ दत्त परब्रह्माय स्वाहा ।।

दिगंबर मुने बाला। समर्था विश्वस्वामीने। परमहंसा महाशून्या। महेश्वासा महानिधे ।।१।। ॐ हंस हंसाय विद्महे। परमहंसाय धीमही । तन्नो दत्त प्रचोदयात ।।२।। ॐ शून्य शून्याय विद्महे । परमशून्याय धीमही। तन्नो परब्रह्म प्रचोदयात् ।।३।। ॐ दत्तात्रेयाय विद्महे। योगीश्वराय धीमही। तन्नो दत्त प्रचोदयात् ।।४।। असो गाणगापुरात। महिमा चंद्रकलेसम वाढत। सिद्धस्थान अद्भुत। प्रसिद्ध आज आहे हो ।।५।। रोगी आणि व्याधिग्रस्त। तैसेची विविध समस्याग्रस्त। सेवा करोनी होती मुक्त ।ऐसे अद्भुत स्थान ते ।।६।। महिमा तया त्रैमूर्तीची । सांगता शक्ती आम्हां कैची। काया धरोनी मानवाची। अद्भुत चरित्र केले हो।।७।। भक्त येती यात्रेसी । एको भावे भक्तीसी। श्री गुरुदर्शन मात्रेसी। सकलाभिष्टे पूर्ण होती।।८।। दैन्य पुरुष होती श्रियायुक्त ।वांझेसी पुत्र होत। आरोग्य मिळे भक्तांप्रत। श्री गुरुते पाहता।।९।। माहूरगड

स्थानात। एक विप्र होता राहत। पुत्र त्याचा व्याधिग्रस्त। सर्व उपाय हरतसे।।१०।। करिती अनेक उपचार। परी रोग दुर्धर। वैद्य आणि मंत्रोपचार। काही तेथे चालेना ।।११।। रोग्याची पत्नी म्हणत। जाऊ गाणगापुरास। नृसिंह सरस्वती समर्थ। यतीवराते पाहावे।।१२।। रोगी पतीसी घेवोन। येई स्वामी दर्शनाकारण। परी प्रवासाचा शीण। त्या रोग्याते साहेना ।।१३।। गाणगापुरी पोचत। श्री स्वामी संगमी असत। श्री गुरुमूर्तीसी पाहत। परमानंदे डोलतसे।।१४।। रोगी असे डोलीत। त्याते काढावे म्हणत। तव तो झाला मृत। पत्नी आकांत करीतसे ।। १५।। कळे स्वामींसी वर्तमान। चरणतीर्थ देवोन। प्रोक्षा म्हणती विप्रा लागोन। जिवंत होवोनी बैसला ।। १६।। सर्व करिती जयजयकार। नृसिंह सरस्वती ईश्वर। प्रकटला पाहा भूवर। नररूपाते धरोनिया।। १७।। ऐसा महिमा अपरंपार। दीनदयाळ करुणासागर। बालमुकुंद भक्तोद्धार। करीत राहे सर्वदा ।। १८।। अनेक रूपे धरीत। दीन जनां उद्धरीत। भगवान श्री दत्त। लोकोद्धारा कष्टतसे।।१९।। त्याचा महिमा अनंत। कृपा त्याची अनंत। रूपे त्याची

अनंत। अनंत नामे तयाची ।।२०।। विश्वोद्धाराकारण। सदैव कष्टे नारायण। अगाध त्याचे महिमान। कोणी वर्णो शकेना ।।२१।। असो गाणगापुरात। नित्य नूतन महिमा होत । दूरदुरोनी लोक येत। स्वामीदर्शना कारणे।।२२।। नित्य होई अन्नदान। भक्त करिती आराधन। होई सहस्त्र भोजन। ऐसे नित्य चालतसे।। २३।। भास्कर नामे विप्र। दारिद्र्ये असे पीडित। स्वामीसी भोजन करावे म्हणत। शिधा घेवोनी येतसे।।२४।। तिघांसी पुरेल इतुके साहित्य। तो सवे घेवोनी येत। परी जव पाहत। असंख्य नित्य जेवताती ।।२५।। रोज जेवती हजार। पाहोनी भ्याले अंतर। स्वामी भोजनाचा विचार। सोडोनी तो देतसे ।।२६।। ब्राह्मण तयासी म्हणत। सहस्त्र भोजन होई नित्य। स्वामीसी तू काय देत। म्हणोनी चेष्टा करताती।।२७।। स्वामी तयासी पाचारिती । शिधा त्याचा पाहती। स्वयंपाक करी म्हणती। ऐसे सांगती तयाला ।। २८।। तिघांपुरते अन्न। तयार करी तो ब्राह्मण। स्वामी म्हणती आण। स्वयंपाक तुझा मज जवळी ।। २९।। कफनी त्यावरी टाकीत। वाढा म्हणती सर्वांप्रत।

शिष्यांसी स्वामी म्हणत। साह्य करावे तयाला ।। ३०।। शिष्य साह्य करीत। पंगती उठो लागत। चार सहस्र जेवीत। ऐसा महिमा श्री गुरूचा ।। ३१।। जलचरांसी देती अन्न। पक्ष्यांसी देती अन्न। होई अन्नपूर्णा प्रसन्न। ऐसा महिमा श्री गुरूचा।। ३२।। सिद्ध म्हणे नामधारकासी । गुरुचरित्र ऐसे परियेसी । याची निमित्ते बहुवसी। भक्त झाले श्री गुरूचे ।। ३३ ।।

।। अध्याय पाचवा ।। ।। ओवी संख्या ३३ ।।

# अध्याय सहावा

## श्री गणेशाय नमः । ॐ नमो सर्व सिद्धाय स्वाहाः ।।

तया गाणगापुरात। महिमा नूतन होई नित्य। दूरदुरोनी लोक येत। श्री गुरुदर्शना कारणे ।।१।। एक ब्राह्मण दर्शना येत। सवे पत्नी असत। वय वर्षे साठ असत। येवोनी नमी श्री गुरूसी ।।२।। श्री गुरु पुसती तियेसी। काय इच्छा मानसी। ती म्हणे पुढील जन्मासी। पुत्र व्हावा म्हणोनिया ।।३।। जाहले वांझ या जन्मात। दूषण करिती समस्त । पुत्र व्हावा पुढील जन्मात। म्हणोनिया प्रार्थितसे ।।४।। श्री गुरु म्हणती तियेसी। कोण जाणे पुढील जन्मासी। याच जन्मी पुत्र कन्येसी। पावसी ऐसे करितो मी ।।५।। वृद्धा म्हणे स्वामीसी। होत नाही विटाळासी। स्वामी म्हणती चिंता कायसी । आपण येथे असताना ।।६।। त्याच रात्री होई विटाळशी। एक वर्षात कन्येसी। जन्म देई वृद्धा हर्षी। ऐसा महिमा श्री गुरूचा ।।७।। नाम सरस्वती ठेवीत। श्री गुरूसी ती म्हणत। नृसिंह केव्हा येत। उदरी माझ्या तवकृपे ।।८।। हासोनी स्वामी म्हणत। पुढील वर्षी पुत्र होत। श्री गुरुवचन यथार्थ। पुत्र झाला परियेसा ।।९।।

ऐसा करुणेचा सागर। भक्त इच्छा पुरविणार। श्री दत्त दिगंबर। गाणगापुरी राहतसे।।१०।। नरहरी नामे एक विप्र। स्वामी दर्शनासी येत। सर्वांगी असे कुष्ठ। शरण येई श्री गुरूसी।।११।। एक काष्ठ त्याते देत। म्हणती सेवी तयाप्रत। पाणी घाली नित्य। सेवा याची तू करी।।१२।। यासी जव येतील पर्ण। जाईल कुष्ठ संपूर्ण। ऐकोनी हे आश्वासन। विप्र घेई काष्ठाते।।१३।। संगमावरी जावोन। तेथे काष्ठ रोवोन। नित्य घाली स्नान। त्या काष्ठासी प्रेमाने।।१४।। ऐसे जाती दिवस सात। श्री गुरु पाहावयासी येत। कमंडलू तीर्थ घालीत। मंत्रोनी त्या काष्ठासी।।१५।। तात्काळ पर्णे फुटत।औदुंबर वृक्ष दिसत। नृसिंह सरस्वती समर्थ। महिमा ऐसा जयाचा।।१६।। तात्काळ विप्राचे कुष्ठ जात। सुवर्ण देह त्याचा होत। नृसिंह स्वामी श्री दत्त। ऐशा लीला तयाच्या।।१७।। एकदा सायंदेवासी। घेवोनी जाती संगमासी। दावोनी वर्षा मायेसी। मन त्याचे पाहिले ।।१८।। म्हणती जाई ग्रामात। अग्नी घेवोनी ये परत। दोन सर्प पाठवीत। पथ दाखविण्या तया लागी।।१९।। काशी महिमा सांगत। गुरुभक्ती करावी म्हणत। दिव्य दर्शन घडवीत। तया सायंदेवासी।।२०।। एक तंतुकार भक्त । स्वामी सेवा करीत। झाडणे सारवण करीत। आश्रमात राही तो।।२१।। शिवरात्री पर्वासाठी। श्रीशैल

यात्रेसी। जाती सर्व ग्रामवासी। भक्त तेथे राहिला ।।२२।। स्वामी म्हणती तयासी। तू का न गेलासी। तो म्हणे तुम्ही शिवची। असता जावे कशाला ।।२३।। शिवरात्रीचे दिवशी। स्वामी म्हणती तयासी। चल जाऊ श्री शैल्यासी। यात्रा पाहोनी येऊ या ।।२४।। तो म्हणे श्रीशैल दूर असत। पंधरा दिन चालाया लागत। आज शिवरात्र असत। कैसे पोचू म्हणतसे ।।२५।। त्यासी जवळ बोलावीत। पाय धरी म्हणती घट्ट। दुसरे क्षणी श्रीशैल पर्वतात। जावोनिया पोचले ते ।।२६।। स्वामी म्हणती भक्ताप्रत। तू जाई मंदिरात। भक्त जाई मंदिरात। शिवदर्शन करावया ।।२७।। मल्लिकार्जुन शिवलिंगात। श्रीनृसिंह सरस्वती दिसत। लोक त्यांचे दर्शन घेत। पाहोनी विस्मित होतसे ।।२८।। करूनी तेथे नमस्कार। परतोनी येई बाहेर। जेथे बैसले श्री गुरुवर। तेथे येवोनी नमितसे ।।२९।। म्हणे आत तुम्हीच आहात। बाहेरही तुम्ही आहात। तुम्ही असता गाणगापुरात। लोक येथे येती का ।।३०।। स्वामी तया म्हणती। क्षेत्रमहिमा सांगती। तो म्हणे नृसिंह सरस्वती। मायेत मजला पाडू नको ।।३१।। तूच अससी परमेश्वर। भरोनी राहसी चराचर। ऐसे म्हणोनी नमस्कार। करी भक्त श्री गुरुते ।।३२।। नंदिनामा ब्राह्मण। सर्वांगी कुष्ठ श्वेत वर्ण। तुळजापुरा जावोन। तीन वर्षे

आराधिले ।।३३।। तीन संवत्सर उपवास। द्विजकष्टला बहुवस। निरोप झाला त्यास। चंदला परमेश्वरी जवळी जाणे।।३४।। जगदंबेचा निरोप घेवोनी। आला चंदला परमेश्वरी स्थानी। मास सात पुरश्चरणी। पुनरपी केले उपवास।।३५।। देवी त्यासी निरोप देत। गाणगापुरी जावे म्हणत। तेथे असती श्री दत्त। बरा तेथे होशील तू।।३६।। विप्रासी क्रोध येत। म्हणे तू देवी असत। मनुष्यापासी का पाठवीत। ऐसे म्हणे देवीसी।।३७।। पुन्हा देवी स्वप्नात येत। क्रोधे त्यासी म्हणत। तो नर नव्हे दत्त। जाई शरण तयालागी।।३८।। दुसरे दिनी प्रभाती। निघे गाणगापुरासी। प्रवास करोनी अष्टदिशी। गाणगापुरी पोचतसे।। ३९।। दुरोनी श्री गुरूसी नमस्कारीत। श्री गुरु त्यासी म्हणत। देवीपासोनी मनुष्याप्रत। का आलासी नरवरा।। ४०।। ऐकोनी ऐसी मात। चरणी नमस्कार करीत। म्हणे तू ईश्वर असत। जाणिले मनींचे सर्वही ।। ४१।। श्री गुरु म्हणती सायंदेवासी। न्यावे संगमी यासी। दूर टाका याच्या वस्त्रांसी। संगमी स्नान करवावे।।४२।। नवी वस्त्रे द्या यासी। आणा मग गाणगापुरासी। ऐसे सांगोनी तयासी। संगमी देती पाठवोनिया।।४३।। जुनी वस्त्रे दूर टाकत। संगमी स्नान करीत। सुवर्ण देह होत । कुष्ठ गेले निघोनिया।।४४।। येई मग गाणगापुरात। श्री स्वामींचे स्तवन करीत।

म्हणे तू त्रैमूर्ती साक्षात। नररूपे अवतरला ।।४५।। ऐसे अगाध महिमान। नित्य होई अन्नदान। ते गाणगापूर स्थान। अपार महिमा तेथींचा ।।४६।। हिपरगी ग्रामात। नंदीनामे कवी असत। शिवावरी कवित्व करीत। पाच कवन नित्य करी ।।४७।। लोक म्हणती तयाप्रत। नृसिंह सरस्वती श्री दत्त। त्यावरी करी काही कवित्व। ऐसे म्हणती तयाला ।।४८।। तो म्हणे श्री शंकर। त्यासी अर्पिले जिव्हार। नृसिंह सरस्वती गुरुवर। नरस्तुती मी न करी ।।४९।। ऐसे बोलूनी आपण। गेला शिवपूजे कारण। पूजा करिता ध्यान। लागले तया द्विजासी ।।५०।। लिंगस्थानी नृसिंह सरस्वती। बैसले तयासी दिसती। हासोनी त्याते म्हणती। माझी पूजा करितोसी का ।।५१।। पाहोनी ऐसा चमत्कार। करी साष्टांग नमस्कार। म्हणे नृसिंह सरस्वती श्री शंकर। नररूपे अवतरला ।।५२।। येवोनी गाणगापुरात। साष्टांग नमस्कार करीत। कवित्व करी नित्य। ऐसा महिमा श्री गुरुंचा ।।५३।। गाणगापुरी श्री गुरु राहत। दर्शना येती सात भक्त। सर्वही श्री गुरुते म्हणत। यावे आमुच्या घरासी ।।५४।। श्री गुरु सर्वां हो म्हणती। सर्व ही आपुल्या घरा जाती। पुन्हा कालांतरे मिळती। म्हणती श्री गुरु घरी आले ।।५५।। आठ रूप झाले आपण। अपार महिमा नारायण। साता ठायी गेले आपण। गाणगापुरीही

होतेची ।।५६।। श्री गुरु नृसिंह सरस्वती। अवतरला असे त्रैमूर्ती। गाणगापुरी वास करिती। आता असे प्रत्यक्ष ।।५७।। किती वर्णावा महिमा। जेथे वेदांची झाली सीमा। लक्षावधी भक्तजना। उद्धरिले पाहा श्री गुरुने ।।५८।। गाणगापूर संगम मार्गात। शेतकरी एक राहत। नमस्कार करी नित्य। श्री गुरु जाता संगमी।।५९।। श्री गुरु एकदा म्हणत। काय आहे तुझ्या मनात। तो म्हणे शेतात। विपुल धान्य पिकावे ।।६०।। श्री गुरु म्हणती तयाप्रत। कापोन टाकी शेत। विस्मये पाही भक्त। काय करावे म्हणोनिया ।।६१।। परी क्षणात सावरोन। म्हणे आज्ञा प्रमाण। टाकी शेत कापोन। वेडा म्हणती लोक त्याते।।६२।। परी घडले विपरीत। ते रात्री अति वर्षा होत। सर्वांचे पीक होई नष्ट। वाचले पीक भक्ताचे ।।६३।। कापलेल्या शेतात। अठरा पट धान्य होत। ज्वारी वाटे लोकांत। ओला दुष्काळ म्हणोनिया।।६४।। ऐसा अगाध महिमा। वर्णिता होई सीमा। एकेक ईश्वरी महिमा। नृसिंह स्वामी सरस्वतीची।।६५।। म्हणोनी सरस्वती गंगाधर। करी श्रोत्यांसी नमस्कार। नृसिंह सरस्वती गुरुवर। श्री दत्त पाहा प्रकटले।।६६।।

।। अध्याय सहावा ।। ।। ओवी संख्या ।। ६६।।

# अध्याय सातवा

श्री गणेशाय नमः। ॐ द्राम दत्तात्रेयाय नमः।

हे दत्तात्रेया गुरुवर्या। मजवरती करी तू दया। सद्भक्तासी सदया। अन्नवस्त्राते देई तू।।१।। तैसेचि देई सद्गुण। देई सद्गुरु दर्शन। करुणामय ज्यांचे जीवन। लोकोद्धारार्थ अवतरले।।२।। तया गाणगापूर ग्रामात। वीस वर्षे श्री गुरु राहत। भीमा अमरजा संगम स्थानात। तप केले श्री गुरुने।।३।। श्रीपाद श्रीवल्लभ अवतारात। रजक एक सेवा करीत। पुनर्जन्मात राजा होत। श्री गुरु म्हणती तयासी।।४।। तो बिदरचा राजा होत। श्री स्वामींच्या दर्शनासी येत। काय रजका कैसा असत। श्री गुरु म्हणती तयाला।।५।। राजाते पूर्वजन्म आठवत। म्हणे श्रींची कुरवपुरात। सेवा केली म्हणोनी या जन्मात। राजा होवोनी जन्मलो।।६।। जेथे श्रींची स्थाने असत। भूमी राजा दान करीत। औदुंबर, नृसिंहवाडीस। ग्रामोत्पन्न दान देतसे।।७।। तैसेचि गाणगापुरात। विपुल दान राजा देत। ब्राह्मण वस्ती

वसवीत। श्री गुरुसेवा करावया ।।८।। रोगी आणि व्याधिग्रस्त। तैसेचि विविध समस्याग्रस्त। सेवा करोनी होती मुक्त। ऐसे अद्भुत स्थान ते ।।९।। आजही गाणगापूर स्थान। असे दिव्य महिमा संपन्न। लाखो लोक दर्शनाकारण। प्रतिवर्षी जाती ते स्थळी ।।१०।। प्रभू दत्त त्या स्थानात। वीस वर्षे स्वये राहत। लोककल्याण कारणार्थ। शक्ती तेथे ठेविती ।।११।। यश, कीर्ती, धन, मान। आरोग्य, ज्ञान, समाधान। सिद्धी, तप, साधन। प्राप्त भक्ता होतसे ।।१२।। ऐसे अद्भुत स्थान। केले जगदोद्धारार्थ निर्माण। आणि स्वये आपण। कर्दळीवनात गेले ते ।।१३।। स्वामी नृसिंह सरस्वती। सर्व भक्ता पाचारिती। कर्दळीवनात जाऊ म्हणती। गुप्त व्हावया कारणे ।।१४।। पादुका स्थापिती तेथ। निर्गुण पादुका त्या म्हणत। आणि तेथोनी निघत। नृसिंह स्वामी सरस्वती ।।१५।। गाणगापुराहुनी निघत। सांगाती असती चार भक्त। श्रीशैल्य पर्वती येत। मल्लिकार्जुनाते पाहावया ।।१६।। काही दिन तेथे राहत। मग भक्तांसी सांगत। जावे तुम्ही आता परत। कर्दळीवनात जातो मी ।।१७।। ऐसे म्हणोनी श्री दत्त। कृष्णा नदीकिनारी येत। कर्दळी पानावरी बैसत। कृष्णा नदी

माझारी ।।१८।। आश्चर्ये पाहती भक्त ।जलावरी श्री गुरु तरंगत। पानावरी बैसोनी जात। पैलतीरासी श्री स्वामी ।।१९।। कर्दळीपर्णी बैसोनी। तरंगत जाती कृष्णेमधुनी। पैलतीरा जावोनी। हात दाविती भक्तांना ।।२०।। दोन पावले पुढे जात। आणि पाहा होती गुप्त। ऐसी लीला अद्भुत। भक्त विस्मये पाहती ।।२१।। नृसिंह स्वामी सरस्वती। कर्दळीवनात गुप्त होती। सातशे वर्षे पूर्ण होती। या घटनेसी अवधारा ।।२२।। कली पाच सहस्र एकशे एक । एकोणीसशे एकवीस शालिवाहन शक । प्रमाथी नाम संवत्सरात। ग्रंथ पूर्ण झाला हा ।।२३।। श्री दत्त आज्ञे करोन। होई ग्रंथ निर्माण। भाविका ताट भरोन। अमृत पाहा वाढले ।।२४।। औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर। दत्त तीर्थे मनोहर। लाखो लोकांचा उद्धार। आजही तेथे होतसे ।।२५।। आजही होती चमत्कार। व्याधी कष्ट होती दूर। श्री नृसिंह सरस्वती गुरुवर। कार्य त्याचे करीतसे ।।२६।। ऐशा लीला अनंत। येथे पाहिल्या संक्षिप्त। दत्तावधूत लीन होत। सद्गुरु चरणी सर्वदा ।।२७।। संक्षिप्त श्री गुरुचरित्र। ग्रंथ येथे पूर्ण होत। सद्भक्तांचे मनोरथ। पूर्ण होती निश्चये ।।२८।। देवतांची कृपा होत। सिद्धांची दर्शने

होत। परमार्थी प्रगती होत। पठणे नित्य ग्रंथाच्या ।।२९।। अडली कामे पूर्ण होत। संसार कष्ट दूर होत। भाविकांसी मोक्ष प्राप्त। ग्रंथ पठणे होतसे ।।३०।। मार्गशीर्ष शुक्ल पक्षात। गुरुवार अष्टमी असत। दत्तजयंती समिपत। ग्रंथ पूर्ण होतसे।।३१।।

।। अध्याय सातवा ।। ।। ओवी संख्या ३१।।

।। इति श्री दत्तावधूत विरचित संक्षिप्त श्री गुरुचरित्र ग्रंथ समाप्त।।

एकूण ओवी संख्या २९४